# The Bombay Hindu Heirs Relief Act, 1866
## (BOMBAY VII OF 1866)

## मुंबईचा हिंदु वारसा कर्ज निवारण अधिनियम, १८६६

### अनुक्रमणिका

प्रस्तावना.


| कलमें. | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | हिंदु मुलगा किंवा नातू तो असा मुलगा किंवा नातू आहे म्हणून पूर्वजांच्या कर्जाबद्दल जबाबदार नसणें. | २६१ |
| २. | वारस हा त्यास मिळालेल्या संपत्तीच्या मर्यादपर्यंतच मयताचा प्रतिनिधि असेल. | २६१ |
| | जी मालमत्ता मिळालेली आहे व जिचा खर्च करण्यांत आला नाहीं अशा मालमत्तेच्या संबंधातील जबाबदारी. | २६१ |
| ३. | [रद्द करण्यांत आलें.] ... ... ... ... ... ... | २६२ |
| ४. | हिंदु विधवेचा पति, हा तिच्या पूर्वीच्या मयत पतीच्या कर्जाबद्दल जबाबदार असणार नाहीं. | २६२ |
| ५. | अविभक्त हिंदु कुटुंबांतील इसमाची, तो अवयस्क असतांना घेतलेल्या कुटुंबासाठींच्या कर्जाबद्दलची जबाबदारी. | २६२ |
| ६. | अविभक्त कुटुंबाच्या हयात असलेल्या इसमास जबाबदारीतून वगळणें ... | २६२ |
| ७. | अर्थविवरण ... ... ... ... ... ... ... | २६३ |
| ८. | [रद्द करण्यांत आलें.] ... ... ... ... ... ... | २६३ |
| ९. | लघु संज्ञा ... ... ... ... ... ... ... | २६३ |

# सन १८६६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७*

## मुंबई हिंदु वारस कर्ज निवारण अधिनियम, १८६६.

[३१ मे १८६६]

हा अधिनियम पुढील अधिनियमाअन्वयें अंशतः रद्द करण्यांत आला आहे :—

सन १८७३ चा अधिनियम १२ ;

सन १८८६ चा मुंबई अधिनियम ३ ;

मयत हिंदु इसमाची, त्याच्या पूर्वजाच्या कर्जाबद्दलची, त्याच्या मुलाची, नातवाची किंवा वारसाची जबाबदारी आणि हिंदु विधवा स्त्रीच्या मयत पतीच्या कर्जाबद्दलची, तिच्या दुसऱ्या पतीची, जबाबदारी मर्यादित करण्याबाबत आणि कर्जदार व धनको या संबंधींच्या विधिमध्यें अन्य रीतीनें सुधारणा करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, मुंबई येथील उच्च न्यायाधिकरण, त्यांच्या सामान्य प्रारंभिक दिवाणी क्षेत्राधिकाराची अंमलबजावणी करतांना हिंदुना ज्याप्रमाणें विधि लागू करील त्याप्रमाणें, अंमलांत असलेल्या विधिनुसार, मयत हिंदुचा कोणताहि मुलगा किंवा नातू हा, असा त्याचा मुलगा किंवा नातू आहे याच केवळ कारणावरून याच्या पूर्वजाच्या कर्जाबद्दल जबाबदार असत नाहीं आणि मयत हिंदुचा कोणताहि मुलगा, नातू किंवा इतर वारस, त्यास मयताची मालमत्ता मिळाली आहे याच केवळ कारणावरून त्यास मिळालेल्या मालमत्तेच्या रकमेहून अधिक रकमेसाठीं त्याच्या पूर्वजाच्या कर्जाबद्दल जबाबदार असत नाहीं आणि हिंदु विधवेशी विवाह करणारा कोणताहि इसम तिच्या पूर्वीच्या मयत पतीच्या कर्जाबद्दल असा विवाह त्यानें केला म्हणून जबाबदार असत नाहीं ; प्रस्तावना.

आणि ज्याअर्थीं जीं दिवाणी न्यायालयें, उक्त उच्च न्यायालयाच्या सामान्य प्रारंभिक दिवाणी क्षेत्राधिकाराच्या स्थानिक हद्दीबाहेरील जागेंत, क्षेत्राधिकारांची अंमलबजावणी करतात त्या दिवाणी न्यायालयाकडून हिंदुला निराळाच विधि लागूं करण्यांत येतो आणि अशा इतर न्यायालयांकडून लागूं करण्यांत येतो अशा विधींत सुधारणा करणें आणि त्याबाबतींल विधिमध्यें संपूर्ण मुंबई इलाख्यांत एकरूपता आणणें इष्ट आहे ; आणि ज्याअर्थीं हिंदु इसमाची, तो जन्मण्यापूर्वीची किंवा तो एकवीस वर्षांहून कमी वयाचा असतांना घेतलेल्या कुटुंबाच्या कर्जाबद्दलची जबाबदारी मर्यादित करणेंसुद्धां इष्ट आहे ; त्याअर्थीं याद्वारें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे—

१. मयत हिंदुचा कोणताहि मुलगा किंवा नातू, तो असा मुलगा किंवा नातू आहे केवळ याच कारणांमुळें, अशा मयत हिंदुच्या कोणत्याहि कर्जाबद्दल त्यावर दावा केला जाण्यास पात्र असणार नाहीं. हिंदु मुलगा किंवा नातू, तो असा मुलगा किंवा नातू आहे म्हणून पूर्वजांच्या कर्जाबद्दल जबाबदार नसणें.

---

*दिनांक १५ नोव्हेंबर १९५९ पर्यंत सुधारलेला.

**वारस हा त्यास मिळालेल्या संपत्तीच्या मर्यादेपर्यंतच मयताचा प्रतिनिधि असेल.**

२. ज्यानें स्वतःहून किंवा त्याचे अभिकर्त्यामार्फत मयताच्या स्वाधीन असलेली कोणतीहि मालमत्ता घेतली आहे किंवा तिचा ताबा घेतला आहे असा मयत हिंदुचा कोणताहि मुलगा, नातू किंवा वारस हा त्यानें अशी कोणतीहि मालमत्ता अशा रीतीनें घेतली आहे किंवा तिचा ताबा घेतला आहे याच केवळ कारणावरून, मयताच्या कोणत्याहि कर्जाबद्दल जातीनें जबाबदार असणार नाहीं ; परंतु, अशा कर्जाच्या बाबतीतील अशा मुलाची, नातवाची किंवा वारसाची जबाबदारी हीं अशा मयत हिंदु इसमाचा प्रतिनिधि म्हणून असेल आणि उक्त जबाबदारी असा मुलगा, नातू किंवा वारस किंवा इतर कोणताहि इसम वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें त्याचे आदेशाद्वारें किंवा त्याचे उपयोगासाठीं जी मिळाली आहे किंवा जिचा ताबा घेतला आहे आणि जिचा खर्च करण्यांत आला नाहीं अशा मयताच्या मालमत्तेमधून देण्यापुरतीच किंवा अशा मालमत्तेच्या मर्यादेपर्यंतच मर्यादित असेल.

**जी मालमत्ता मिळालेली आहे व जिचा खर्च करण्यांत आला नाहीं अशा मालमत्तेच्या संबंधांतील जबाबदारी.**

परंतु वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें अशा रीतीनें मिळालेल्या किंवा ताबा घेतलेल्या अशा मालमत्तेच्या कोणताहि भागाचा जर असा मुलगा, नातू किंवा वारस यानें, योग्य रीतीनें खर्च केला नसेल तर तो, त्यानें ज्या मालमत्तेचा योग्य रीतीनें खर्च केला नसेल अशा मालमत्तेच्या मर्यादेपर्यंत अशा कर्जाबद्दल जातीनें जबाबदार असेल.

३. [अनिर्णित दावे] सन १८७३ चा अधिनियम १२ अन्वयें रद्द करण्यांत आले.

**हिंदु विधवेचा पति, हा तिच्या पूर्वीच्या मयत. पतीच्या कर्जाबद्दल जबाबदार असणार नाहीं.**

४. ज्यानें हिंदु विधवेशी विवाह केला आहे असा कोणताहि इसम, असा विवाह त्याने केला आहे केवळ याच कारणावरून, अशा विधवेच्या कोणत्याहि पूर्वीच्या मयत पतीच्या कोणत्याहि कर्जाबद्दल जबाबदार असणार नाहीं.

**अविभक्त हिंदु कुटुंबांतील इसमाची, तो अवयस्क असतांना घेतलेल्या कुटुंबा-साठींच्या कर्जाबद्दलची जबाबदारी.**

५. हा अधिनियम अंमलांत आल्यानंतर एखाद्या अविभक्त कुटुंबांतील एक किंवा अधिक इसम, जे कर्ज अविभक्त कुटुंबाचे कर्ज होईल अशा रीतीनें जर कर्ज घेईल तर असें कर्ज घेण्याचें वेळीं ज्याचा जन्म झाला नव्हता किंवा जो एकवीस वर्षांपेक्षां कमी वयाचा होता असा अविभक्त कुटुंबाचा कोणताहि इसम तें देण्यास जातीनें जबाबदार असणार नाहीं. परंतु, असा इसम, अशा इसमानें किंवा त्याच्या आदेशाद्वारे किंवा याच्या उपयोगासाठीं इतर कोणत्याहि इसमानें जी मालमत्ता घेतली आहे किंवा तिचा ताबा घेतला आहे आणि जिचा खर्च करण्यांत आला नाहीं अशा अविभक्त कुटुंबाच्या मालमत्तेतून, आणि कर्ज घेतल्याचें वेळीं जे एकवीस वर्षे वयांहून अधिक वयाचे होते अशा अविभक्त कुटुंबाच्या कोणत्याहि मयत इसमांच्या स्वाधीन असलेल्या स्वतंत्र मालमत्तेतून, जर कोणतीहि असल्यास, वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें अशा रीतीनें घेतलेल्या किंवा ताबा घेतलेल्या अशा मालमत्तेचा कोणत्याहि भागाचा अशा इसमानें योग्य रीतीनें खर्च केला नसेल ती बाब खेरीजकरून, कर्ज देण्यास किंवा अशा मालमत्तेच्या मर्यादेपर्यंत देण्यास पात्र ठरेल व अशा रीतीनें घेतलेली किंवा ताबा घेतलेली मालमत्ता योग्य रीतीनें खर्च करण्यांत आली नसेल अशा बाबतींत असा इसम, त्यानें जिचा योग्य रीतीनें खर्च केला नाहीं अशा मालमत्तेच्या मर्यादेपर्यंत अशा कर्जाबद्दल जातीनें आणखी जबाबदार असेल.

**अविभक्त कुटुंबाच्या हयात**

६. कलम ५ मध्यें जी तरतूद केली असेल ती खेरीजकरून, ह्या अधिनियमांतील कोणत्याहि उपबंधामुळें सध्यां अंमलांत असलेल्या विधिअन्वयें अशा अविभक्त कुटुंबांतील हयात इसम किंवा अशा अविभक्त कुटुंबांतील इसम कर्ज देण्यास पात्र होईल किंवा होतील अशा परिस्थितींत घेतलेल्या कोणत्याहि

कर्जाबद्दलच्या एखाद्या अविभक्त हिंदु कुटुंबांतील हयात इसम किंवा अविभक्त हिंदु कुटुंबांतील हयात असलेल्या इसम म्हणून कोणत्याहि इसमाच्या, जबाबदारी मर्यादित होते किंवा त्यावर परिणाम होतो असा त्याचा अर्थ लावतां कामा नये. इसमास जबाबदारीं-तून वगळणें.

७. ह्या अधिनियमांत वापर केलेल्या "कर्ज" या संज्ञेंत, मयत हिंदु इसम जर हयात असता तर त्याचे विरुद्ध जे कोणतेहि दावे करतां आले असते किंवा करतां येऊं शकतील अशा कोणत्याहि दाव्यांतून उद्भवणाऱ्या आणि ज्याबद्दल त्याचे प्रतिनिधीविरुद्ध खटला केला जाऊं शकेल अशा सर्व जबाबदाऱ्यांचा समावेश होईल. अर्थविवरण.

८. [अधिनियमाची सुरुवात] सन १८७३ च्या अधिनियम १२ याअन्वयें गाळण्यांत आलें.

९. ह्या अधिनियमास सर्व कारणासाठीं मुंबई हिंदु वारसा कर्ज निवारण अधिनियम, १८६६, असें म्हणावें. लघुसंज्ञा.